हुमणी अळीच्या प्रादुर्भावामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान >>पान 2

२०२३-२४ चे उत्कृष्ट ग्रंथालय आणि उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता व सेवक पुरस्कार जाहीर >>पान 3

गाय चोरी केल्याच्या संशयावरून तरुणाला जात- धर्म विचारून निर्वस्त्र करून निर्दयपणे मारहाण करणाऱ्या आरोपी विरुद्ध कठोर कारवाई >>पान 4


**सुविचार**

स्वच्छ विचार हेच यशाचे पाऊल आहे.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034




अक्षय कुमारची मुलगी नितारा मुंबई विमातळावर कुटुंबासह झाली स्पॉट, व्हिडिओ व्हायरल...


आतील पान



■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 11 ■ बुधवार, दि. 30 जुलै 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006


# काँग्रेसच्या उथळपणामुळे देशाचे मनोबल खचले

## पहलगाम हल्ल्यातही ते राजकारण शोधत होते; पंतप्रधान नरेंद्र मोदींचा हल्लाबोल

नवी दिल्ली : संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या सहाव्या दिवशी (२९ जुलै) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लोकसभेत भाषण केलं. यावेळी त्यांनी काँग्रेसने जम्मू-काश्मीरमधील पहलगाम हल्ला आणि 'ऑपरेशन सिंदूर' या संदर्भात उपस्थित केलेल्या प्रश्नांना ठामपणे उत्तर दिलं आणि विरोधकांवर जोरदार हल्लाबोल केला. पंतप्रधान म्हणाले, ''जे भारताचा दृष्टिकोन पाहत नाहीत, सत्य स्वीकारत नाहीत, त्यांना मी आरसा दाखवणार आहे.''



भारताला आपल्या सैन्यावर पूर्ण विश्वास : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या भाषणात सांगितलं की, ''भारताला आपल्या सैन्याच्या क्षमतेवर, शौर्यावर आणि रणनीतीवर पूर्ण विश्वास आहे. या विश्वासाच्या आधारावरच सैन्याला कारवाईची परवानगी देण्यात आली आणि कधी, कुठे व कशा प्रकारे प्रत्युत्तर द्यायचं, हे सैन्यच ठरवेल, असा निर्णय घेण्यात आला''. ते पुढे म्हणाले की, ''मी संसदेत भारताची बाजू मांडण्यासाठी उभा आहे आणि जे सत्य पाहू शकत नाहीत, त्यांना आरसा दाखवण्याचं काम करणार आहे. मी १४० कोटी देशवासीयांच्या भावना मांडण्यासाठी उभा आहे, त्या स्वरांमध्ये माझा स्वर मिसळण्यासाठी आलो आहे,'' असंही त्यांनी नमूद केलं.

पंतप्रधान मोदीं पुढे म्हणाले की, ऑपरेशन सिंदूरदरम्यान देशातील जनतेनं ज्या प्रकारे पाठिंबा आणि आशीर्वाद दिला, ते त्यांच्यासाठी एक ऋण आहे. त्यांनी देशवासीयांचे आभार मानले आणि अभिनंदनही केलं. पंतप्रधानांनी २२ एप्रिल रोजी जम्मू-काश्मीरमधील पहलगाम इथं झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा उल्लेख करताना सांगितलं की, निष्पाप नागरिकांना धर्म विचारून गोळ्या घालणं ही क्रौर्याची परिसीमा होती. त्यांनी या घटनेला भारताला हिंसेच्या आगीत ढकलण्याचा आणि देशात दंगे भडकवण्याचा एक सुनियोजित कट असल्याचं सांगितलं.

पंतप्रधान मोदी यांनी पुढे सांगितलं की, २२ एप्रिल रोजी जेव्हा पहलगाममध्ये दहशतवादी हल्ला झाला, तेव्हा ते परदेशात होते. मात्र त्यांनी तत्काळ भारतात परत येत उच्चस्तरीय बैठक घेतली. या बैठकीत त्यांनी स्पष्ट निर्देश दिले की, दहशतवाद्यांना कठोर आणि निर्णायक प्रत्युत्तर दिलं जावं. त्यांनी हेही स्पष्ट केलं की ही कारवाई केवळ सूडासाठी नव्हती, तर तो राष्ट्रीय संकल्प होता.

पंतप्रधान मोदींनी पहलगाम हल्ल्यावरून काँग्रेसनं जे राजकारण केलं, त्यावरही जोरदार टीका केली. त्यांनी म्हटलं, ''काँग्रेसच्या उथळपणामुळे देशाचं मनोबल खचलं. पहलगामच्या हल्ल्यासारख्या गंभीर प्रकरणातही ते राजकारण शोधत होते.''

पंतप्रधान मोदींनी सांगितलं की, ६ मेच्या रात्री आणि ७ मेच्या पहाटे भारतानं अशी कारवाई केली, ज्याची भीती पाकिस्तानला आधीपासूनच वाटत होती. ''२२ एप्रिलचा बदला २२ मिनिटांत घेतला गेला''. असंही मोदींनी सांगितलं.

# कोकाटे, तुमच्यामुळे सरकारची बदनामी होतेय, बोलताना भान ठेवायला हवं

## अजित पवारांनी अँटी चेंबरमध्ये माणिकरावांना सुनावलं

**मुंबई/प्रतिनिधी :** शेतकऱ्यांविषयी वादग्रस्त वक्तव्यांचा सपाटा आणि विधानपरिषदेत अधिवेशनकाळात ऑनलाईन रमी खेळतानाचा व्हिडीओ व्हायरल झाल्याने टीकेच्या भोवऱ्यात सापडलेले राज्याचे कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांचा राजीनामा घेतला जाणार की नाही, याचा लवकरच फैसला होणार आहे. आज राज्यमंत्रिमंडळाची बैठक आहे. त्यापूर्वी माणिकराव कोकाटे आपल्या मुलीसह मंत्रालयात आले होते.



त्यांनी अजित पवार यांच्या अँटी चेंबरमध्ये जाऊन त्यांची भेट घेतली. अँटी चेंबरमध्ये झालेल्या चर्चेवेळी अजित पवार यांनी माणिकराव कोकाटे यांची खरडपट्टी काढल्याचे समजते.

अजित पवार यांनी माणिकराव कोकाटे यांना स्पष्टपणे नाराजी बोलून दाखवली. कोकाटे तुमच्यामुळे सरकारची बदनामी होत आहे. बोलताना आपण भान ठेवायला हवं, असे अजित पवार यांनी कोकाटे यांना म्हटल्याचे समजते. यानंतर माणिकराव कोकाटे यांनी झाल्या प्रकाराबद्दल अजित पवार यांच्याकडे दिलगिरी व्यक्त केली. पुढील काळात अशा बाबी घडणार, असे आश्वासनही दिले. यानंतर थोडीफार जुजबी चर्चा होऊन अजित पवार आणि माणिकराव कोकाटे यांच्यातील बैठक संपली. यानंतर अजित पवारांच्या दालनात प्री-कॅबिनेट बैठकीला सुरुवात झाली आहे. या बैठकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख नेते अजित पवार यांच्या दालनात जमले आहेत.

आता थोड्याचवेळात अजित पवार हे माणिकराव कोकाटे यांच्या राजीनाम्याबाबतचा निर्णय जाहीर करु शकतात. माणिकराव कोकाटे यांच्या सभागृहात ऑनलाईन रमी खेळणे आणि 'शासन भिकारी आहे' या वक्तव्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही नाराजी व्यक्त केली होती. त्यामुळे अजितदादांवर कोकाटे यांचा राजीनामा घेण्यासाठी दबाव वाढला होता.

माणिकराव कोकाटे यांच्या कृषीमंत्रिपदाची राजीनामा घेऊ नये, अशी मागणी घेऊन नाशिक जिल्ह्यातील शेतकरी संघटनेचे काही कार्यकर्ते मंत्रालयात आले होते. या कार्यकर्त्यांनी अजित पवार यांची भेट घेऊन आपले म्हणणे मांडले. त्यावेळी अजित पवार यांनी या कार्यकर्त्यांना प्रतिसवाल केला. किती वेळा चुका करणार आणि किती वेळा माफ करायचं? आता राजीनामा नको म्हणून आपण आलात. मात्र, ज्यावेळी मी स्वत:हून मंत्रिपद दिलं त्यावेळी कुणीही आलं नव्हतं. सतत चुका होतं असल्यामुळे आता माफी नाही, अशी भूमिका अजित पवार यांनी मांडल्याचे समजते. त्यामुळे आता पुढे काय होणार, याची उत्सुकता राजकीय वतुर्ळा लागली आहे.

## मराठी चित्रपट अभिनेता प्रसाद ओक सहपरीवार साईचरणी







मराठी चित्रपट अभिनेता प्रसाद ओक यांनी सहपरीवार श्री साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेतले. दर्शनानंतर श्री साईबाबा संस्थानच्या वतीने उप मुख्य कार्यकारी अधिकारी भिमराज दराडे यांनी त्यांचासत्कारकेला.

# अन्नधान्याच्या गुणवत्तेत सुधारणा करण्यासाठी केंद्र सरकारचे ठोस पावले

## नवीन प्रणालीमुळे अचूकता आणि विश्वासार्हतेत वाढ

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** राज्यसभेत केंद्रीय राज्यमंत्री यांचे खासदार डॉ. अनिल बोंडे यांच्या प्रश्नाला उत्तर

देशातील जनतेला उच्च प्रतीचे अन्नधान्य उपलब्ध व्हावे यासाठी केंद्र सरकारने महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. अन्न व सार्वजनिक वितरण मंत्रालयाने अन्नधान्याच्या गुणवत्तेत सुधारणा करण्यासाठी एक अभिनव ''गुणवत्ता व्यवस्थापन प्रणाली विकसित केली आहे. राज्यसभेत अनुत्तरित प्रश्न क्रमांक ९९९ अंतर्गत खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना केंद्रीय राज्यमंत्री श्रीमती निमूबेन जयंतिभाई बंभनिया यांनी सांगितले की, केंद्रासाठी खरेदी केली जाणारी अन्नधान्ये विभागाने निश्चित केलेल्या *एकसंध तपशिलांनुसार खरेदी केली जातात. ही गुणवत्ता व्यवस्थापन प्रणाली प्रयोगशाळेतील कामकाजाचे रिअल टाईम मॉनिटरिंग करते. त्यामुळे अन्नधान्याच्या खरेदीपासून ते वितरणापर्यंतच्या प्रत्येक टप्प्यावर गुणवत्ता नियंत्रण अधिक कार्यक्षम व अचूक होत आहे.

या पद्धतीमुळे अन्नधान्य साठवणूक, परीक्षण आणि वितरण प्रक्रियेत पारदर्शकता, अचूकता व जनतेचा



विश्वास वाढणार आहे. सरकारच्या या निर्णयामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या अन्नधान्याला योग्य दर मिळण्याची आणि सामान्य जनतेला दर्जेदार अन्नधान्य उपलब्ध होण्याची अपेक्षा आहे.

## झारखंडमध्ये कावड यात्रेकरूंनी भरलेल्या बसला ट्रकने धडक दिली,१८ कावडियांचा मृत्यू

देवघर : झारखंडमधील देवघरमध्ये मंगळवारी एक अत्यंत भीषण अपघात घडला आहे. कावड यात्रेकरूंनी भरलेल्या एका बसला ट्रकने धडक दिल्याने १८ कावडियांचा जागीच मृत्यू झाला असून, अनेक जण गंभीर जखमी झाले आहेत. हा अपघात गोड्डा- देवघर राष्ट्रीय महामार्गावर झाला, ज्यामुळे परिसरात हाहाकार उडाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गोड्डा- देवघर राष्ट्रीय महामार्गावर, मोहनपूर पोलिस स्टेशन हद्दीतील परिसरात एका ट्रकने कावडिया यात्रेकरूंनी भरलेल्या बसला जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की, बसचा अक्षरश: चक्काचूर झाला. अपघातानंतर तात्काळ बचावकार्य सुरू करण्यात आले, मात्र तोपर्यंत १८ यात्रेकरूंचा दुर्दैवी मृत्यू झाला होता.

अपघाताची माहिती मिळताच स्थानिक पोलीस आणि प्रशासकीय अधिकारी घटनास्थळी दाखल झाले आहेत. जखमींना तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. मृतदेहांची ओळख पटवण्याचे काम सुरू आहे. श्रावण महिन्यात देवघर येथे बाबा बैद्यनाथ धाम येथे दर्शनासाठी मोठ्या संख्येने कावड यात्रेकरू येतात. हा अपघात अशा वेळी झाला आहे, जेव्हा कावड यात्रेकरूंची मोठी गर्दी असते.

# लम्पी आजारांच्या नियंत्रणासाठी पशुपालकांनी उपाययोजना राबवावी

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जनावरांमध्ये झपाट्याने फैलावत असलेल्या लम्पी चर्मरोगाचा प्रादुर्भाव लक्षात घेता पशुपालकांनी वेळीच प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक आहे. यासाठी जिल्ह्यात विविध गावांमध्ये जनजागृती मोहीम राबविण्यात येत असून, पशुपालकांनी शिफारशीत उपाययोजना करून या विषाणूजन्य रोगापासून जनावरांचे संरक्षण करावे, असे आवाहन जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यसाय डॉ.अमितकुमार दुबे यांनी केले आहे.


जिल्ह्यातील मलकापुर, देऊळगाव राजा, सिंदखेड राजा, खामगाव व चिखली या तालुक्यांमध्ये गोजातीय पशुधनामध्ये लंपीचर्मरोग सदृश्य लक्षणे आढळुन आलेली आहेत. लंपीचर्मरोग हा आजार विषाणुजन्य आजार असल्याने या रोगाचा प्रादुर्भाव प्रतिबंध व नियंत्रण वेळीच करणे

### लंपी चर्मरोग प्रतिबंधासाठी लसीकरण मोहिम

अत्यंत आवश्यक आहे. जिल्ह्यामध्ये ३ लक्ष ६० हजार ८१५ गोवर्गीय पशुधन असुन ३ लक्ष १६ हजार ५०० लंपीचर्मरोग प्रतिबंधक लसमात्रांचा पुरवठा उपलब्ध असून लसीकरण मोहीम युद्धस्तरावर राबविण्यात येत आहे. सध्या मलकापुर, चिखली, देऊळगाव राजा, सिंदखेड राजा व खामगाव या तालुक्यातील बाधीत जनावरांचे रोगनिदानाकरीता नमुने रोग अन्वेषण विभाग पुणे येथे सादर करण्यात आले होते. सदर नमुन्यांचा निष्कर्ष होकारार्थी आलेले असल्याने रोगाचा प्रसार इतर तालुक्यांमध्ये होवु नये, या करीता प्रतिबंध करण्यासाठी उपाययोजना राबविण्यात येत आहे.

**रोगाचे कारण व प्रसार:** लम्पी स्किन डिसीज हा एक विषाणूजन्य चर्मरोग असून, तो कॅप्रीपॉक्स व्हायरसमुळे होतो. रोगाचा प्रसार प्रामुख्याने चावणाऱ्या माश्या, डास, गोचीड, चिलटे यांच्या माध्यमातून, बाधित व निरोगी जनावरांच्या संपर्कातून, नाक-डोळ्यातील स्त्राव, तोंडातील लाळ चाऱ्यावर व पाण्यावर लागल्यास संसर्ग होतो. या रोगाचा सर्व वयोगटातील जनावरांवर परिणाम होतो, मात्र लहान वासरे अधिक प्रभावित होतात. उष्ण आणि दमट हवामानात कीटकांची वाढ अधिक असल्याने पावसाळ्यात प्रादुर्भाव वाढतो.

**लक्षणे :** ताप येणे व दुध उत्पादनात घट, डोळ्यातून पाणी येणे, लसिका ग्रंथीना सूज, त्वचेवर गाठी (१०-५० मिमी व्यासाच्या), मुख्यतः डोके, मान, पायावर, फुफ्फुसदाह, कासदाह, गर्भपात व प्रजनन क्षमतेत घट, पांढऱ्या रक्तपेशींची संख्या कमी होणे या रोगाचे लक्षणे



आहे.

**उपचार व घरगुती उपाय :** प्रतिजैविके, ज्वरनाशक, जीवनसत्त्वे ( व ) व शक्तिवर्धक औषधांचा वापर, त्वचेवरील व्रणांवर फ्लाय रिपेलंट स्प्रे, तोंडातील व्रणासाठी २% पोटॅशियम परम्यांगनेट द्रावण व बोरोग्लीश्रीन. घरगुती उपाय: १० खायची पाने, १० ग्रॅम मीरे, १० ग्रॅम मीठ यांची पेस्ट करून त्यात गूळ मिसळून जनावरांना द्यावी, पहिल्या दिवशी दर ३ तासांनी, दुसऱ्या दिवशीपासून दिवसातून ३ वेळा १५ दिवसपर्यंत, जखमांमध्ये किडे पडल्यास खोबरेल तेलात कापूर, सीताफळाच्या पानांचा लेप लावावा.

**रोगनियंत्रण व प्रतिबंधात्मक उपाय :** बाधित व निरोगी जनावरांना वेगळे ठेवावे, एकत्रित चारा-पाणी देऊ नये, जनावरांचे गोठयांमध्ये २ टक्के सोडीयम हायपोक्लोराईड द्रावण २० मिली प्रति लिटर किंवा २ टक्के फिनाईल द्रावण ३० मिली प्रति लिटर किंवा १ टक्के फॉरमॅलीन १०मिली. प्रति लिटर पाण्यामध्ये फवारणी केल्यास गोठयामधील किटकांचे निर्मुलन करता येईल. पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली लसीकरण करावे, गोठा स्वच्छ ठेवणे, माशा व डास यांचे नियंत्रण करणे अत्यावश्यक आहे.

या आजारावर उपाय करण्यापेक्षा प्रतिबंध करणे महत्त्वाचे असून, पशुपालकांनी जवळच्या पशुवैद्यकीय दवाखान्याशी संपर्क साधावा आणि नियमित सल्ला घ्यावा. जनावरांचे नुकसान टाळण्यासाठी वेळीच लसीकरण करून घ्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## ६४ घरांची मराठमोळी राणी

जॉर्जिया देशाची राजधानी असलेल्या बटूमी या शहरात पार पडलेल्या जागतिक महिला बुद्धिबळ विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम फेरीत मराठमोळ्या दिव्या देशमुखने भारताच्याच कोनेरू हंपी हिला टायब्रेकरमध्ये २.५ – १.५ अशी आघाडी घेऊन विश्वविजेतेपद मिळवले आणि इतिहास घडवला. अवघ्या १९ वर्षाच्या दिव्याची ही कामगिरी स्वप्नवत अशीच आहे. तिच्या या कामगिरीने १३ कोटी मराठी माणसांचीच नाही तर १४५ कोटी भारतीयांची मान देखील अभिमानाने उंचावली आहे. हे विश्वविजेतेपद मिळवून दिव्याने आपणच ६४ घरांची नवी राणी असल्याचे सिद्ध केले. तिच्या कामगिरीचे जितके कौतुक करावे तितके कमी आहे कारण ही स्पर्धा जेंव्हा सुरू झाली तेंव्हा तिला कोणीही जमेस धरले नव्हते. तिच्यापेक्षाही दिग्गज आंतरराष्ट्रीय बुद्धिबळपटू या स्पर्धेत सहभागी झाले होते. या स्पर्धेत जगभरातील १०७ बुद्धिबळपटू निवडले गेले होते. बाद फेरीने रंगलेल्या या स्पर्धेत अंतिम फेरीसाठी निवडलेल्या बुद्धिबळपटूत अव्वल तीन खेळाडू हे चीनचे होते. चौथी खेळाडू ही भारताचीच अंतिम फेरीत पोहचलेली कोनेरू हंपी होती. दिव्याचे स्थान पंधरावे होते. अंतिम फेरीसाठी आठ भारतीय आणि आठ चिनी खेळाडूंची निवड झाली होती. रशियाचेही काही खेळाडू अंतिम फेरीत होते. चीन, रशिया या देशातील खेळाडूंचा या स्पर्धेत दबदबा होता. भारताच्याही कोनेरू हंपी हिला विश्वविजेतेपदासाठी प्रबळ दावेदार समजले जात होते पण नवख्या दिव्याला मात्र कोणीच या स्पर्धेचे संभाव्य विजेते म्हणून संबोधले नव्हते मात्र जशीजशी स्पर्धा पुढे सरकत गेली तशीतशी दिव्याची कामगिरी सरस ठरत गेली. आपल्या प्रतिस्पर्धी खेळाडूंवर मात करत दिव्या पुढे जात होती. अंतिम फेरी चीनच्या दोन खेळाडूत होईल अशी स्पर्धेच्या सुरवातीस जी शक्यता वर्तवण्यात आली होती ती फोल ठरवत दिव्या आणि कोनेरू यांनी सर्वांना चकित करून अंतिम फेरी गाठली. अंतिम फेरीत दोन भारतीय खेळाडू असल्याने हा विश्वचषक भारताकडेच राहील हे स्पष्ट झाले. अंतिम फेरीत दिव्याची गाठ अनुभवी ग्रँडमास्टर कोनेरू हंपी हिच्याशी पडली. ३८ वर्षीय ग्रँडमास्टर कोनेरू हंपी ही भारताचीच नव्हे तर जगातील दिग्गज बुद्धिबळपटू आहे. तिने याआधी अनेक आंतरराष्ट्रीय स्पर्धा जिंकून आपले श्रेष्ठत्व सिद्ध केले आहे. अंतिम फेरीपूर्वी कोनेरूच सर्वाची हॉट फेवरेट होती कारण १९ वर्षाची दिव्या तिच्यापुढे अतिशय नवखी होती. कोनेरूने २००२ साली जागतिक जलद बुद्धिबळ स्पर्धा जिंकली होती. त्यानंतर तीन वर्षांनी दिव्याचा जन्म झाला होता. कोनेरूकडे अनुभव होता तर दिव्याकडे आत्मविश्वास होता. उपांत्य फेरीत दोघींनी चीनच्या खेळाडूंवर मात केली होती. अंतिम फेरीच्या सुरुवातीचे दोन्ही डाव बरोबरीत सुटले. टायब्रेकरच्या दुसऱ्या डावात दिव्याने वर्चस्व राखले. तिने हा डाव ७५ चालित जिंकला आणि विश्वविजेतेपदावर मोहोर उमटवली. अंतिम फेरीत अनुभवावर आत्मविश्वासाने मात केली आणि दिव्या बुद्धिबळाची नवी राणी ठरली. हा विश्वकप जिंकणारी दिव्या ही भारताची चौथी खेळाडू ठरली. याआधी हा किताब कोनेरू हंपी, रमेशबाबू वैशाली आणि द्रोणवली हरिका यांनी जिंकला होता. या विजेतेपदाबरोबर दिव्या आता ग्रँडमास्टरही बनली आहे. ग्रँडमास्टर ठरणारी ती भारताची चौथी खेळाडू ठरली आहे. अर्थात दिव्याला मिळालेले हे यश एका रात्रीत मिळालेली नाही त्यासाठी तिला मोठा त्याग आणि परिश्रम करावे लागले आहे. ज्या वयात मुले टीव्हीवर कार्टून पाहण्यात व्यग्र असतात त्या वयात तिने बुद्धिबळ खेळण्यास सुरुवात केली. बुद्धिबळासाठी ती टीव्ही आणि मोबाईलपासून दूर राहिली. दिव्याने बुद्धिबळावर लक्ष केंद्रित करावे म्हणून तिच्या पालकांनी घरातील टीव्ही बंद केला. बुद्धिबळात आवड निर्माण झाल्यावर दिव्याने अवघ्या पाचव्या वर्षी पहिले विजेतेपद मिळवले. पाचव्या वर्षी बुद्धिबळात पहिले विजेतेपद मिळवणाऱ्या दिव्याने पुढे आपल्या विजेतेपदाचा धडाका सुरू केला. दिव्याने २००२ साली महिला बुद्धिबळ स्पर्धेचे विजेतेपद मिळवले आणि त्यानंतर पुढील वर्षी आशियाई स्पर्धेचे विजेतेपद मिळवले. दिव्या अंडर २० विश्वचषक स्पर्धेची ज्युनियर चॅम्पियन देखील ठरली आहे. तिचा हा प्रवास निश्चितच प्रेरणादाई आहे. तिचे हे विजेतेपद देशातील किशोरवयीन मुलांसाठी प्रेरणादाई आहे. तिच्यामुळे आता ही मुले देखील बुद्धिबळाकडे वळतील आणि भविष्यात भारताला आणखी दिव्या मिळतील यात शंका नाही. जागतिक विश्वचषक बुद्धिबळ स्पर्धा जिंकून ६४ घरांची नवी राणी बनलेल्या मराठमोळ्या दिव्या देशमुख हिचे विश्वविजेतेपदासाठी मनापासून अभिनंदन!!!

# हुमणी अळीच्या प्रादुर्भावामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान

## दुबार पेरणीसाठी बियाणे व तातडीने भरपाई देण्यात यावी : जयश्री शेळके

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्ह्यात बुलडाणा, मोताळा आणि चिखली तालुक्यात प्रामुख्याने सोयाबीन या पिकावर हुमणी अळी या किडीचा मोठ्या प्रमाणावर प्रादुर्भाव झालेला आहे. यामुळे शेतकऱ्यांना गंभीर आर्थिक फटका बसत असून, काही ठिकाणी ८०% पर्यंत नुकसान झाल्याचे आढळले आहे.

हुमणी अळी ही जमिनीच्या आत राहणारी कीड असून, ती पिकांच्या मुळांवर उपजीविका करते. त्यामुळे पिकांची मुळे सडू लागतात, पाने पिवळी पडतात, वाढ खुंटते आणि उत्पादनात लक्षणीय घट होते. ऊस, सोयाबीन, कापूस, हळद यांसारख्या पिकांमध्ये या





अळीचा प्रादुर्भाव विशेष करून दिसून येतो.

बुलडाणा जिल्ह्यातील कृषी विभागाच्या प्राथमिक अंदाजित अहवालानुसार सध्या ३१४.७४ हेक्टर क्षेत्र हुमणी अळीमुळे बाधित झाल्याचे नोंदवले गेले आहे. मात्र, प्रत्यक्षात बाधित क्षेत्र यापेक्षाही जास्त असल्याचा अंदाज स्थानिक शेतकरी व तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे.

या पार्श्वभूमीवर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या प्रवक्त्या जयश्री शेळके यांनी काही दिवसांपूर्वी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देत तातडीने पंचनामे करण्याची मागणी केली होती. आज त्यांनी मोताळा तालुक्यातील मोहेगाव शिवारात पीक पाहणी केली. त्यांच्या मते फक्त पंचनामे करून भागणार नाही. शासनाने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना दुबार पेरणीसाठी मोफत किंवा सवलतीत बियाणे उपलब्ध करून द्यावेत. तसेच झालेल्या नुकसानीची भरपाई लवकरात लवकर वितरित करावी,'' अशी ठाम भूमिका त्यांनी मांडली आहे.

पावसाचे अनिश्चित स्वरूप, हुमणी अळीचा प्रकोप आणि वाढलेला उत्पादन खर्च यामुळे शेतकरी गंभीर आर्थिक अडचणीत सापडले आहेत. त्यामुळे प्रशासनाने पंचनाम्यांनंतर केवळ अहवाल नोंदवून थांबू नये, तर बाधित शेतकऱ्यांना तात्काळ मदत दिली जावी. शासनाने या परिस्थितीकडे गांभीर्याने पाहून तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी ॲड.जयश्री शेळके यांनी केली आहे. पिक पाहणी करतेवेळी मोताळा कृषि सहायक माधुरी बुंदे, राजूरचे तलाठी अजित पालवे, गोपीचंद राठोड, भास्कर पवार, लीलाबाई राठोड, धुपेशवर राठोड, प्रमिला बाई राठोड, उखा राठोड, गजानन जाधव, भारत राठोड, सागर चव्हाण, गजानन चव्हाण, आकाश राठोड. सचिन राठोड यांच्यासह मोहेगाव येथील अनेक शेतकरी बांधव उपस्थित होते.

# कराडच्या कृष्णा पुलावरून तरुणीची थेट नदीत उडी, कारण अद्यापही अस्पष्ट

**सातारा/प्रतिनिधी :** कराडमधील कृष्णा नदीच्या पुलावरून तरुणीने उडी मारल्याची घटना समोर आली असून, आजूबाजूच्या परिसरात एकच खळबळ उडालीय. सोमवारी रात्री साडे नऊच्या नदीत उडी घेऊन तरुणीनं आपलं जीवन संपवण्याचा प्रयत्न केलाय. लग्न ठरलेल्या आणि दोन दिवसांपूर्वीच साखरपुडा झालेल्या तरुणीने कराडमधील कृष्णा नदीच्या पुलावरून थेट उडी मारल्याची घटना घडल्यानं स्थानिकांमध्ये तो चर्चेचा विषय ठरत आहे. कल्पना बाळाप्पा वाघमारे (वय २६, सध्या रा. वाखाण रोड, कराड, मूळ रा. जत, जि. सांगली), असं तरुणीचं नाव आहे. या घटनेमुळं खळबळ उडाली असून, घटनेमागील कारण अद्याप स्पष्ट झालेलं नाही. घटनेनंतर काल रात्री पुलावर बघ्यांची मोठी गर्दी झाली होती. तरुणी अजूनही बेपत्ता आहे.

दुचाकीवरून आली अनब नदीत मारली उडी : सोमवारी (२८ जुलै) रात्री साडे नऊच्या सुमारास कल्पना वाघमारे ही तरुणी दुचाकीवरून कृष्णा पुलावर आली. गाडी उभी करून ती मोबाईलवरून कोणाशी तरी बोलली. त्यानंतर तिने थेट नदीत उडी मारली. ही घटना पाहून आरडाओरडा केल्यानंतर वाहनधारकांची पुलावर मोठी गर्दी झाली. घटनेची माहिती दिल्यानंतर कराड शहर पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पुलावर तरुणीची दुचाकी आणि सॅक आढळून आली.

कुटुंबीय, नातेवाईकांची घटनास्थळी धाव : तरुणीशी लग्न ठरलेला मुलगा काही वेळातच घटनास्थळी पोहोचला. तसंच कुटुंबीय आणि नातेवाईकही आले. पोलिसांनी तरुणीची सॅक आणि त्यातील साहित्य दाखवल्यानंतर कुटुंबीयांनी ओळखले. त्यानंतर तरुणीच्या आईने हंबरडा फोडला. वडिलांनाही जबर धक्का बसला. नातेवाईकांनी धीर देत तरुणीच्या आईला रूग्णालयात नेलं.

तरुणी करत होती खासगी नोकरी : कल्पना वाघमारे ही खासगी रुग्णालयात नोकरी करत होती. सॅकमध्ये तिची पर्स, ओळखपत्र आणि इतर साहित्य आढळून आलं. त्यावरून कल्पनानेच नदीत उडी मारल्याचं स्पष्ट झालं. पोलिसांनी तातडीने एनडीआरएफ टीमला पाचारण केलं होतं. तसंच स्थानिक मच्छीमारही उपस्थित होते. मात्र, अंधारामुळे शोध मोहीम राबवता आली नाही. आज सकाळी तरुणीचा शोध सुरू करण्यात आला आहे.

काल रात्री एनडीआरएफची टीम घटनास्थळी दाखल झाली होती. मात्र, अंधारामुळे शोध मोहीम राबवता आली नाही. आता नगरपालिकेच्या सहकार्याने शोध कार्य सुरू करणार आहोत. तरुणीने नदीत उडी का मारली, त्यामागील कारण शोधण्याचा पोलीस प्रयत्न करत आहेत, अशी माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजू ताशिलदार यांनी दिलीय.

## वाहतूक कोंडी फुटणार, घणसोली, कोपरखैरणे प्रवास सुसाट होणार, नवी मुंबई महापालिकेचा मोठा निर्णय

**नवी मुंबई/प्रतिनिधी :** वाहतूक कोंडीने हैराण नवी मुंबईकरांसाठी महत्त्वाची बातमी आहे. घणसोली, पामबीच, कोपरखैरणे परिसरातील वाहतूक कोंडीचा प्रश्न सुटणार असून प्रवास अधिक सुसह्य होणार आहे. ठाणे-बेलापूर मार्गाला वाशीकडून ठाण्याकडे जाणाऱ्या मार्गावर महापेतून कोपरखैरणेला जोडणाऱ्या उड्डाणपुलाची मार्गिका बनवण्यात येणार आहे. यासाठी निविदाही काढण्यात आली असून ठेकेदारांची पात्रता सिद्ध झाल्यास मार्गिका बनवण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. नवी मुंबई महापालिका उड्डाणपुलाची मार्गिका बनवण्यासाठी २४ कोटी रुपये खर्च करणार आहे. या उड्डाणपुलाची लांबी ४३१ मीटर असणार आहे. तर हा उड्डाणपूल झाल्यानंतर कोपरखैरणे येथील भुयारी मार्गातून होणारी वाहतूक कोंडी संपुष्टात येणार आहे.

नव्या उड्डाणपुलाची लांबी ४३१ मीटर तर रुंदी ७.५० मीटर असेल.


ठाणे ते बेलापूर मार्गाच्या समांतर ट्रान्स हार्बर मार्ग असून पूर्वेला एमआयडीसी तर पश्चिमेला सिडको वसाहत आहे. पूर्वेकडील ठाणे - बेलापूर मार्गावरून सिडकोकडे जाण्यासाठी उड्डाणपूल तसेच भुयारी मार्ग बांधण्यात आला आहे. पण कोपरखैरणे येथे जाण्यासाठी भुयारी मार्ग बांधलेला नाही. तसेच भुयारी मार्गातून बस आणि इतर अवजड वाहने जात नाहीत. एकच मार्गिका असल्याने वाहतूक कोंडीचे प्रमाण देखील जास्त आहे. त्यामुळे कोपरखैरणेकडे जाताना वाहनचालकांना कोपरीवरून किंवा घणसोलीतून ५-६ किमीचा फेरफटका मारून जावे लागते.

दरम्यान, कोपरखैरणेतून महापे उड्डाणपुलाला मार्गिका जोडल्यास महापे, कोपरखैरणे आणि घणसोली येथील वाहतूक कोंडीचा प्रश्न सुटेल. तसेच भविष्यात ऐरोली घणसोली उन्नत मार्गाकडे जाणाऱ्या वाहनांनाही या मार्गिकेचा लाभ होईल.

# अक्षय कुमारची मुलगी नितारा मुंबई विमातळावर कुटुंबासह झाली स्पॉट, व्हिडिओ व्हायरल...

**मुंबई/प्रतिनिधी** बॉलिवूडमध्ये खिलाडी कुमार अक्षय कुमार हा नेहमीच चर्चेत असतो. अक्षय हा आपल्या व्यग्र वेळापत्रकातून कुटुंबासाठी पूर्ण वेळ काढत असतो. मात्र अक्षयच्या कुटुंबातील सदस्य चित्रपट जगतापासून दूर राहतात. ट्विंकल खन्नानं तिच्या अभिनय कारकिर्दीतून बाहेर पडल्यानंतर लेखिका म्हणून प्रसिद्धी मिळवली. आता ती तिचा सर्व वेळ तिच्या मुलांवर आणि तिच्या स्वतःच्या शिक्षणावर घालवते. अलीकडेच ती तिच्या कुटुंबासह मुंबई विमानतळावर स्पॉट झाली होती. यादरम्यान तिची मुलगी नितारा देखील तिच्याबरोबर होती. आता एक सोशल मीडियावर व्हिडिओ व्हायरल झाला आहे.

अक्षय कुमारचं कुटुंब विमातळावर झाले स्पॉट : या व्हिडिओमध्ये डिंपल कपाडिया ट्विंकल खन्ना, नाओमिका सरन आणि अक्षय कुमारची लाडकी मुलगी नितारा एकत्र असल्याचे दिसत आहे. हे सर्वजण विमातळावरून बाहेर



पडत आहे. दरम्यान सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या व्हिडिओमध्ये डिंपल कपाडिया पॅप्स पाहताच बाजूला झाली. याशिवाय ट्विंकल खन्ना मुलीबरोबर आपल्या कारच्या दिशेनं जात असल्याची दिसली. यावेळी ट्विंकल खन्नानं पांढऱ्या टी-शर्टसह निळा ब्लेझर आणि ट्राउझर्स घातले होते. यामध्ये ती सुंदर दिसत होती. ट्विंकल खन्नाच्या बाजूला असलेली भाची नाओमिका सरननं टी-शर्ट आणि लोअर घातलेले होते. तिचा नो मेकअप लूक असून ती खूप आकर्षक दिसत होती.

नितारांचं सोशल मीडियावर झालं कौतुक : दरम्यान नाओमिका सरन, बॉलिवूडमध्ये पदार्पण करण्याची तयारी करत आहे. पहिल्यांदाच असे दिसून येत आहे की, नितारा पॅप्सपासून लपलेली नाही. आता अक्षय कुमारच्या कुटुंबाचा हा व्हिडिओ अनेकांना आवडत आहे. या व्हिडिओवर अनेकजण भरभरून प्रेम देत आहेत. हा व्हिडिओ पाहिल्यानंतर लोकांचे लक्ष निताराकडे वळत आहे, कारण ती सोशल मीडियावर क्वचितच दिसते. आता सोशल मीडियावर अनेकजण नितारावर प्रेमाचा वर्षाव करत आहेत. या व्हिडिओवर अनेकजण हार्ट आणि फायर इमोजी शेअर करत आहेत. दरम्यान ट्विंकल खन्ना अनेकदा लंडनमध्ये तिची बहीण रिंकी खन्नाच्या घरी जात असते.


# जळगावच्या आमदाराकडे माझ्या जावयाच्या लॅपटॉपमधील फोटो अनब माहिती कशी जाते? एकनाथ खडसेंचा सवाल, पुणे पोलिसांविरोधात शड्डू ठोकला!

**पुणे/प्रतिनिधी :** पुण्यातील रेव्ह पार्टीवर २७ जुलै रोजी पोलिसांनी छापा टाकला होता. या कारवाईत राष्ट्रवादी शरद पवार गटाचे ज्येष्ठ नेते एकनाथ खडसे यांचा जावई आणि राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या महिला प्रदेशाध्यक्ष रोहिणी खडसे यांचे पती प्रांजल खेवलकर यांना अटक करण्यात आली. या प्रकरणी सर्व आरोपींना दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर आज (दि. २९) एकनाथ खडसे यांनी पत्रकार परिषद घेत पुणे पोलिसांच्या कार्यकुशलतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहेत. जळगावच्या आमदाराकडे माझ्या जावयाच्या लॅपटॉपमधील फोटो अनब माहिती कशी जाते? असा सवाल उपस्थित करत एकनाथ खडसे यांनी पुणे पोलिसांविरोधात शड्डू ठोकलाय.

पत्रकार परिषदेत एकनाथ खडसे म्हणाले की, मला पोलीसांना विचारायचे आहे की, याला रेव्ह पार्टी म्हणायचे का? रेव्ह पार्टीची व्याख्या काय? पोलीस बदनामी करतायत. तिथे ना डान्स ना म्युझिक आहे. पोलिसांनी खाजगी ठिकाणी असलेल्या लोकांचे व्हिडीओ शूट करुन ते माध्यमांना पुरवले. हा बदनामी करण्याचा प्रयत्न आहे. प्रांजल खेवलकरांचा अल्कोहोलचा रिपोर्ट मिडियाकडे कसा जातो? तो आम्हाला का मिळत नाही? अंमली पदार्थांचा रिपोर्ट का समोर येत नाही? ससून रुग्णालयाचा अहवाल बदलला जाण्याची भीती आहे. कारण ससूनचे मागील काही काळातील रेकॉर्ड तसे आहे.

प्रांजल खेवलकर यांच्यावर पाळत ठेवण्याचे कारण काय?

माझ्या जावयाने मला सांगितलं की, मी आयुष्यात कधीही ड्रग्ज घेतलेले



नाही, आताही घेतलेले नाही. वैद्यकीय अहवालात या गोष्टी समजतील. पण तो रिपोर्ट अजून का येत नाही, यामध्ये संशय घ्यायला जागा आहे. माझ्या जावयाने सांगितलं की, माझ्यावर पाळत ठेवण्यात आली. ते दोन-तीन ठिकाणी गेले तिथे त्यांच्यावर पाळत ठेवण्यात आली. सिव्हिल ड्रेसमधील पोलीस त्यांच्यावर पाळत ठेऊन होते. त्याचे व्हिडीओ आहेत. पोलिसांना प्रांजल खेवलकर यांच्यावर पाळत ठेवण्याचे काय कारण आहे? ज्या हॉटेलमध्ये हे सगळे गेले होते, तिकडेही पोलीस रात्री १ ते २.३० च्या दरम्यान आले. या हॉटेलच्या पार्किंगमधील व्हिडिओ कॅमेऱ्यात सिव्हिल ड्रेसमधील पोलीस दिसत आहेत. त्याच पोलिसांनी छापा टाकला. हा प्रकार संशयास्पद आहे.

प्लॅन करुन कोणी कारवाई करत असेल तर...

पोलीस इतकी तत्परता दाखवतात की, लगेच पत्रकार परिषद आणि व्हिडीओ दाखवतात. एवढी तत्परता प्रफुल लोढा जो हनी ट्रॅपमध्ये अडकलेला आहे, बलात्कारात अडकलेला आहे, ज्याने गिरीश महाजनांवर आरोप केले आहे, यासंदर्भात पोलीस यंत्रणा पुढाकार घेऊन जनतेला का माहिती देत नाही? पोलीस यंत्रणेने खडसेंना कशा रितीने बदनाम करायचे, हा प्लॅन आखलेला दिसत आहे. वारंवार खडसेंचे जावई दाखवले जात आहे. सत्य असेल तर कारवाई करायला माझी हरकत नाही. पण प्लॅन करुन कोणी कारवाई करत असेल तर योग्य नाही. सरकारने याचे उत्तर दिले पाहिजे. पोलीस कारवाईतील फोटो आणि व्हिडीओ कसे बाहेर आले, असा सवाल खडसे यांनी विचारला.

पुणे पोलिसांविरोधात बदनामीचा दावा दाखल करणार

मी कोणत्या मंत्री किंवा मुख्यमंत्र्यांवर आता आरोप करणार नाही. पण, पोलीस कोणाच्या सांगण्यावरुन काम करतायेत, असे वाटते. ससूनला आम्ही पत्र दिले आहे की, जेव्हापासून या प्रकरणात कारवाई सुरु झालीय, त्यावेळचे सीसीटीव्ही फुटेज मिळावेत. जळगावच्या आमदाराकडे माझ्या जावयाच्या लॅपटॉपमधील फोटो आणि माहिती कशी जाते? मी पुणे पोलिसांच्या विरोधात बदनामीचा दावा दाखल करणार आहे, असे म्हणत त्यांनी पुणे पोलिसांविरोधात शड्डू ठोकलाय.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### चोपडा तालुक्यात लंपीचे १४ पशु; लंपीचे पशुवर वैद्यकीय उपचार सुरु



दैनिक आपला विदर्भ

**जळगाव/प्रतिनिधी :** पावसाळा सुरू झाल्याने जळगाव जिल्ह्यात बऱ्याच तालुक्यांमध्ये पशु लंपी च्या आजाराने ग्रासले आहेत. त्यामध्ये चोपडा तालुक्यात १४ पशुंना लंपी च्या आजाराने बाधित झाले असल्याने त्यांच्यावर उपचार सुरु आहेत. चोपडा शहरात ९ लंपीचे पशु असून, त्यापैकी ४ पशु वैद्यकीय उपचाराने बरे झाले आहेत. तर ५ पशु बरे होण्याच्या दिशेने आहेत. तर लासुर येथे ५ पशुंना लंपीच्या आजाराने बाधित झाले असल्याने त्यांच्यावर वैद्यकीय उपचार सुरु आहेत. त्यापैकी १ पशु दगावले असून, ४ पशु आजारापासून बरे होत आहेत. चोपडा तालुक्यातील शेतकऱ्यांना पशुंना लंपी आजार होऊ नये, यासाठी गोटा स्वच्छ ठेवणे घाणीचे साम्राज्य नसावे. अश्या सूचना करण्यात असल्याचे पशुवैद्यकीय अधिकारी अविनाश कुलदीपकर यांनी सांगितले.

### आमदार रोहित पवार यांनी महादेव मुंडे यांच्या कुटुंबियांची घेतली भेट



**बीड/प्रतिनिधी :** राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते आमदार रोहित पवार यांनी परळीतील महादेव मुंडे यांच्या कुटुंबियांची भेट घेतली आहे. यावेळी त्यांनी महादेव मुंडे यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडेंसह कुटुंबीयांना धीर दिला आहे. महादेव मुंडे यांच्या मारेकऱ्यांना तात्काळ अटक करा, ही मागणी घेऊन बीडच्या कनेरवाडी येथे ३ दिवसापूर्वी रस्ता रोको करण्यात आला होता. तर या रस्ता रोकोप्रकरणी ज्ञानेश्वरी मुंडे यांच्यासह नातेवाईकांवर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. त्यामुळे आता आमदार रोहित पवार यांनी मुंडे कुटुंबीयांची भेट घेतली असून माहिती देखील घेतली आहे. दरम्यान यावेळी मुंडे कुटुंबियांना धीर देत त्यांनी त्या ठिकाणाहूनच बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांच्याशी देखील फोनवरून संवाद साधला. मुंडे खून प्रकरणातील आरोपींना तात्काळ अटक करा, मनात विविध विषयांवर चर्चा देखील केली आहे.

### कृत्रिम फुलांवर बंदी; शेतकऱ्यांच्या मागणीला यश

**छत्रपतीसंभाजीनगर/प्रतिनिधी :** राज्यात अनेक महिन्यांपासून कृत्रिम फुलांचा वापर मोठ्या होत असून, मोठ्या प्रमाणात याचा फटका फुल शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना बसत आहे. त्याचे थेट पडसाद पावसाळी अधिवेशनात उमटले, कृत्रिम फ ुलांवर बंदी घालण्याची मागणी विधानसभेत अनेक आमदारांनी केली. याप्रश्नी अधिवेशन संपण्यापूर्वी पर्यावरण मंत्री आणि आमदारांच्या संयुक्त बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. तेव्हा मंत्री भरत गोगावले यांनी सभागृहात ही घोषणा केली. शहरात राज्यात अनेक समारंभात, लग्नकार्यात, मंदिरांमध्ये कृत्रिम फुलांचा अतिरिक्त वापर केला जात आहे. फुलांची बाजारपेठ उद्ध्वस्त होत चालली असून, त्याचा थेट फटका राज्यातील शेतकऱ्यांना बसत आहे. प्लास्टिक फुलावर बंदी घातली तर शेतकऱ्यांना न्याय मिळेल.



# २०२३-२४ चे उत्कृष्ट ग्रंथालय आणि उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता व सेवक पुरस्कार जाहीर

## - १२ ऑगस्ट २०२५ रोजी पुरस्कार वितरण - उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांची घोषणा

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील उत्कृष्ट सार्वजनिक ग्रंथालयांना देण्यात येणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट सार्वजनिक ग्रंथालय पुरस्कार आणि ग्रंथालय चळवळीतील कार्यकर्ते व सेवक यांना दिले जाणारे डॉ. एस. आर. रंगनाथन उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता व सेवक (ग्रंथमित्र) पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. दि. १२ ऑगस्ट २०२५ रोजी पाटकर सभागृह, एसएनडीटी महिला विद्यापीठ,मुंबई येथे पुरस्कार वितरण करण्यात येणार आहे. अशी घोषणा उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांची केली.

सन २०२३-२४ या वर्षासाठीचे हे पुरस्कार असून यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट सार्वजनिक ग्रंथालय पुरस्कार शहरी विभागात चार आणि ग्रामीण विभागात तीन उत्कृष्ट ग्रंथालयांना त्यांच्या वर्गवारीनुसार जाहीर करण्यात आले आहे. शहरीभागासाठी रोख रक्कम अनुक्रमे एक लाख ते २५ हजार रुपये, ग्रामीण भागासाठी ७५ हजार ते २५ हजार अनुक्रमे आणि सन्मानचिन्ह प्रमाणपत्र असे स्वरूप आहे.

डॉ. एस. आर. रंगनाथन उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता (ग्रंथमित्र) पुरस्कार राज्यस्तरावर दोघांना पुरस्कार रक्कम ५०हजार आहेत. विभागस्तरावर पाच जणांना जाहीर झाले आहेत. तर डॉ. एस. आर. रंगनाथन उत्कृष्ट ग्रंथालय सेवक (ग्रंथमित्र) पुरस्कार हे विभागस्तरावर सहा जणांना जाहीर झाले आहे. या सर्व पुरस्कारासाठी रोख २५ हजार रुपये, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र असे स्वरूप आहे.

या पुरस्कार सोहळ्याचे वितरण लवकरच करण्यात येणार आहे

उत्कृष्ट सार्वजनिक ग्रंथालय पुरस्कार

**शहरी विभाग**

सार्वजनिक वाचनालय, शिवाजी चौक, कल्याण पश्रि्चम, ता.कल्याण, जि.ठाणे

सर्वात्मक वाचनालय, बापू बंगला स्टॉप, इंदिरानगर, नाशिक

ज्ञानदीप सार्वजनिक वाचनालय, वाघापूर, ता.जि.यवतमाळ

मा. शिल्पकार ल. ना. भालेराव सार्वजनिक वाचनालय, पंचवटी, नाशिक

**ग्रामीण विभाग**

१) स्व. समीर (तात्या) सोनटक्के वाचनालय, चोराखळी, ता. कळंब, जि. धाराशिव

२)बलराम सार्वजनिक वाचनालय, फुलउमरी, ता. मानोरा, जि. वाशिम

३) प्रगती सार्वजनिक वाचनालय, सिल्ली (आंबाडी) जि. भंडारा

डॉ. रंगनाथन उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता पुरस्कार

**राज्यस्तरीय ग्रंथालय कार्यकर्ता (ग्रंथमित्र)**

१) श्री. धनंजय वसंतराव पवार, अध्यक्ष, श्री. गुणवंतराव रामचंद्र पाटील सार्वजनिक वाचनालय, हासाळा, पो. बुधोडा, ता. औसा, जि. लातूर

**राज्यस्तरीय ग्रंथालय सेवक (ग्रंथमित्र)**

१) श्रीमती श्रध्दा अशोक आमडेकर, ग्रंथपाल, श्री सदगुरु लोकमान्य वाचनालय देवरुख, तालुका संगमेश्र्वर, जिल्हा-रत्नागिरी

विभागस्तरीय पुरस्कार

१) अमरावती: श्री. रामभाऊ पंढरी मुळे, सचिव, छत्रपती शाहू सार्वजनिक वाचनालय, मु. पो. हनुमान नगर, अकोला, ता.जि. अकोला.

२) छत्रपती संभाजीनगर: श्री. खंडेराव साहेबराव सरनाईक, अध्यक्ष, श्री संत ज्ञानेश्र्वर सार्वजनिक वाचनालय, केंद्रा बु., ता. सेनगाव, जि. हिंगोली.

३) नाशिक: श्री. राहुलकुमार मालजी महिरे, अध्यक्ष, बौध्दवासी



शांताई महिरे वाचनालय, आखाडे, मु.पो. आखाडे, ता. साक्री, जि.धुळे

४) पुणे: श्री. दत्तात्रय सखाराम देशपांडे, अध्यक्ष, ज्ञानदा मोफत वाचनालय, जरळी, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर

५) मुंबई: श्री. सुभाष सीताराम कुळकर्णी, अध्यक्ष, प्रा. माणिकराव कीर्तने वाचनालय वाशी, नवी मुंबई

डॉ. रंगनाथन उत्कृष्ट ग्रंथालय सेवक पुरस्कार

१) अमरावती: श्री. अनंत श्रीराम सातव, ग्रंथपाल, सरस्वती वाचनालय, पातुर्डा बु., ता.संग्रामपूर, जि.बुलडाणा

२) छत्रपती संभाजीनगर: श्री. सूर्यकांत कमलाकर जाधव, ग्रंथपाल, विवेकानंद वाचनालय, आलमला, ता. औसा, जि. लातूर ३)नागपुर: श्री. खेमचंद अंताराम डोंगरवार, ग्रंथपाल,श्रीमती सोनाबाई सितारामजी खुणे सार्वजनिक वाचनालय, नवेगाव / बांध, ता.अर्जुनी मोरगाव, जि. गोंदिया

४)नाशिक: श्री. चिंतामण संतोष उगलमुगले, ग्रंथपाल, ओंकार नगर सार्वजनिक वाचनालय, ओंकारनगर, पेठ रोड, ता.जि. नाशिक

५)पुणे: श्रीमती रुपाली यशवंत मुळे, ग्रंथपाल, श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले) नगर वाचनालय, सातारा.


६)मुंबई: श्री. संजय काशिनाथ शिंदे, ग्रंथपाल, नगर वाचन मंदिर, मालवण, जि. सिंधुदुर्ग

राज्यातील जनतेचे सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक जीवन समृद्ध करण्यासाठी व वाचन संस्कृती वृध्दींगत होण्यासाठी शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांचे योगदान लाभावे, यासाठी ग्रंथालयांचा गुणात्मक विकास व्हावा, या ग्रंथालयांकडून राज्यातील जनतेला अधिक चांगल्या सेवा देण्यासाठी त्यांना प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने शासनाकडून दरवर्षी हे पुरस्कार देण्यात येत असल्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगितले.

# गाय चोरीच्या संशयावरून दलित युवकाला मारहाण; ३ आरोपींवर ॲट्रॉसिटीसह विविध कलमांखाली गुन्हा दाखल, १ आरोपी अटकेत

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप



**बुलढाणा :** बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव शहरातील रहिवासी रोहन संतोष पैठणकर (वय २१) या दलित युवकाला २३ जुलै महिन्याच्या रात्री बसस्थानकाजवळ उभा असताना, गब्बू गुजरीवाल आणि प्रशांत गोपाल संगेले या दोघांनी जबरदस्तीने मोटारसायकलवर बसवून काँग्रेस भवनाजवळ नेले आणि दगडाने बेदम मारहाण केली. इतक्यावरच न थांबता त्यांनी त्याचे कपडे आणि चड्डी काढण्याचा प्रयत्न केला, रोहनने माफी मागूनसुद्धा त्यांनी मारहाण थांबवली नाही. त्याच्या अंगावर गायी सोडल्या



आणि याचा व्हिडिओ शूट केला. नंतर पुन्हा त्याला जबरदस्तीने मोटारसायकलवर बसवून घाटपुरी नाक्याजवळील मोकळ्या मैदानात नेऊन लाथाबुक्क्यांनी अमानुष मारहाण केली. तेव्हा रोहित पगारिया नावाचा त्यांचा मित्र तिथे आला आणि त्यानेसुद्धा रोहनला मारहाण केली. यानंतर इतर काही तरुणांनाही तिथे बोलावण्यात आले. रोहनने दिलेल्या तक्रारीनुसार, आरोपी त्याला विचारत होते की ''इमरान कोण आहे?'' आणि ''हा गाय चोर आहे'' असे म्हणून त्याला मारहाण करत होते. याच दरम्यान पोलिस घटनास्थळी पोहोचले होते. या प्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गब्बू गुजरीवाल, प्रशांत गोपाल संगेले आणि रोहित पगारिया यांच्याविरोधात विविध कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## पोलीस ठाणे घनसावंगी हद्दीतील कुंभारपिंपळगाव येथे सोन्या चांदीचे दागिने घरफोडी करणारे अट्टल गुन्हेगार जेरबंद



**जालना/प्रतिनिधी :** जालना जिल्ह्यात पोस्टे घनसावंगी हद्दीतील कुंभारपिंपळगाव येथील ज्ञानेश्वर मधुकर दहीवाळ यांचे ज्ञानेश्वरी ज्वैलर्स येथे दिनांक २३/०७/२०२५ रोजी फिर्यादीचे दुकानाच्या चॅनेल गेटचे व शटरचे कुलूप तोडुन दुकानात प्रवेश करुन, ४ अज्ञान इसमांनी त्यांच्या दुनाकातुन १९,७६,५०० रुपयाचे सोने चांदीचे दागिने चोरुन नेले वरुन चार अज्ञात ईसमां विरुद्ध पोलीस ठाणे घनसावंगी गुरनं. ३९२/२०२५ कलम ३३१(४),३०५ (अ) भान्यासं प्रमाणे गुन्हा दाखल झाला.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक अजयकुमार बंसल व अपर पोलीस अधीक्षक श्री. आयुष नोपाणी, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव, सपोनि योगेश उबाळे, सोवत स्थागुशाचे अमंलदार सॅम्युअल कांबळे, भाऊराव गायके, प्रभाकर वाघ, रमेश राठोड, लक्ष्मीकांत आडेप, सागर बाविस्कर, इरशाद पटेल, संदीप चिंचोले, सतिष श्रीवास, आक्रूर धांडगे, रमेश काळे, धीरज भोसले, कैलास चेके, सौरभ मुळे अशोक जाधवर यांनी केली आहे.

# कलावंतांचे ऑनलाईन अर्ज करण्यास मदत वाढ द्या; बुलढाणा जिल्हाअधिकारी यांना निवेदन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** छत्रपती शाहू महाराज ज्येष्ठ कलावंत मानधन योजनेअंतर्गत ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम तारीख वाढविण्यात यावी, अशी मागणी राष्ट्रीय लोक कलावंत दिव्यांग निराधार संघर्ष समिती च्या वतीने बुलढाणा जिल्हाधिकारी यांना २८ जुलै रोजी निवेदनाद्वारे केली आहे.

जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, छत्रपती शाहू महाराज ज्येष्ठ कलावंत मानधन योजनेचा लाभ घेण्यासाठी ऑनलाईन अर्ज भरण्याची अंतिम तारीख ३१ जुलै निश्चित करण्यात आली आहे. तथापि, अनेक ज्येष्ठ कलावंत हे वेळेत अर्ज






भरू शकले नाहीत. सद्यस्थितीत पोर्टल कार्यरत नसल्यामुळे अनेकांना तांत्रिक अडचणींमुळे ऑनलाइन अर्ज करता आला नाही. सध्या पावसाळ्याचे दिवस सुरू असून, काही ठिकाणी अतिवृष्टी व ढगफ ुटीमुळे इंटरनेट सेवा व वीजपुरवठा खंडित झाला आहे. ग्रामीण व आदिवासी भागातील कलावंतांना माहिती व तांत्रिक सहाय्य मिळण्यात अडथळे येत आहेत. वरील सर्व बाबी लक्षात घेऊन, आम्ही आपल्याकडे नम्र विनंती करतो की ऑनलाईन अर्ज भरण्याची अंतिम तारीख किमान १५ दिवसांनी वाढवून पोर्टल पुन्हा सुरु करण्यात यावे, जेणेकरून या योजनेचा लाभ खरोखर गरजू व पात्र कलावंतांना मिळू शकेल. आपण या सामाजिक व कलात्मक दृष्टिकोनातून महत्त्वपूर्ण असलेल्या मागणीचा सकारात्मक विचार करून लवकरात लवकर कार्यवाही करावी, अशी मागणी राष्ट्रीय लोक कलावंत दिव्यांग निराधार संघर्ष समिती च्या वतीने बुलढाणा जिल्हाधिकारी यांना निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. निवेदनावर राष्ट्रीय लोक कलावंत दिव्यांग निराधार संघर्ष समितीचे सचिव सतिष बोरकर, पांडूरंग सपकाळ, उपाध्यक्ष दुर्गादास काटे, राज्य संघटक विजय चव्हाण, संस्थापक अध्यक्ष संदिपकुमार जगदिश बोरकर आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## विविध वृत्त...

### सत्ताधारी सापापेक्षाही विषारी असल्याची माजी मंत्री बच्चू कडू यांची सरकारवर जोरदार टीका




दैनिक आपला विदर्भ

**यवतमाळ/प्रतिनिधी** : माजी मंत्री बच्चू कडू यांनी पुसद तालुक्यातील गहुली येथे आयोजित शेतकरी आत्मचिंतन बैठकीत सत्ताधाऱ्यांवर जोरदार हल्ला चढवला. सत्तेतील लोक सापापेक्षाही विषारी आहेत. अशा शब्दांत त्यांनी सरकारवर टीकास्त्र सोडले. यावेळी सातबारा कोरा यात्रेच्या शेवटच्या दिवशी महागाव तालुक्यातील अंबोडा येथे गुन्हे दाखल झालेल्या शेतकऱ्यांचा बच्चू कडू यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. भाषणात बच्चू कडू म्हणाले की, हे सरकार मणियार जातीचे आहे, जे चावले हे लक्षातही येत नाही. त्यांनी माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांचा उल्लेख करत शेतकऱ्यांसाठी ते फासावर जाण्यासही तयार होते, तर आजचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दुष्काळ कुठे आहे? असे विचारतात या दोन्ही मुख्यमंत्र्यांमधील फरक त्यांनी अधोरेखित केला.

### जैन अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष ललित गांधी यांचा जिल्हा दौरा

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : जैन अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष व राज्य अल्पसंख्यांक आयोगाचे सदस्य ललित गांधी हे बुधवार व गुरुवार दि. ३० व ३१ जुलै २०२५ रोजी बुलढाणा जिल्हा दौऱ्यावर येत आहेत.

त्यांच्या दौरा कार्यक्रमानुसार बुधवार दि. ३० जुलै रोजी रात्री ८ वाजता जैन स्थानक, गांधीनगर चिखली येथे समाज बांधव बैठक. त्यानंतर रात्री १० वाजता बुलढाणाकडे रवाना. रात्री ११ वाजता शासकीय विश्रामगृह, बुलढाणा येथे आगमन व राखीव.

गुरुवार दि.३१ जुलै २०२५ रोजी सकाळी ९ वाजता जैन मंदिर, स्थानिक दर्शनार्थ भेटीसाठी. सकाळी ११.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय येथे जिल्हाधिकारी व जिल्हा प्रशासनातील सर्व प्रमुख यांच्या समवेत आढावा बैठक. दुपारी २.३० वाजता जैन अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ कार्यालयाचे उद्घाटन स्थळ: इतापे ले आऊट, चिखली रोड बुलढाणा. दुपारी ३.३० वाजता भगवान महावीर निर्वाण कल्याणक निबंध स्पर्धा पुरस्कार वितरण समारंभ व जैन समा पदाधिकारी यांची नियोजन भवन सभागृहात संवाद बैठक. सायंकाळी ५.३० वाजता कॉन्फरन्स हॉल जिल्हाधिकारी कार्यालय येथे जिल्ह्यातील व्यापारी-उद्योजक संघटना पदाधिकारी बैठक. सायंकाळी ७ वाजता कारंजा जि. वाशिमकडे रवाना होतील.

### जागतिक मानवी तस्करी विरोधी दिनानिमित्त 30 जुलै रोजी परिसंवाद; संवेदनशीलता ते संकल्प : शोषणाविरोधात लढा

**मुंबई/प्रतिनिधी** : संयुक्त राष्ट्रसंघाने ३० जुलै हा जागतिक मानवी तस्करी विरोधी दिन म्हणून घोषित केला आहे. या निमित्ताने मानवी तस्करी या समस्येबाबत चर्चा व्हावी, जनजागृती व्हावी यासाठी महाराष्ट्र राज्य महिला आयोगाने संवेदनशीलता ते संकल्प: शोषणाविरोधात लढा या राष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन बुधवार दि. ३० जुलै २०२५ रोजी सह्याद्री अतिथीगृह येथे केले आहे. आयोगाच्या अध्यक्षा श्रीमती रूपाली चाकणकर यांच्या संकल्पनेतून होणाऱ्या या कार्यक्रमास विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, राज्याच्या पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे मार्गदर्शन करणार आहेत. जगभरातील अनेक देश मानवी तस्करी या सर्वाधिक वेगाने वाढणाऱ्या गुन्हेगारी विरोधात लढा देत आहेत. भारतातही मानवी तस्करी हा चिंतेचा विषय आहे. मानवी तस्करीचे प्रकार, तस्करी ओळखणे, तस्करी रोखण्यासाठी संबंधित घटकांना प्रशिक्षण, यंत्रणांतील समन्वय, पीडितांना मदत, न्यायलयीन सहाय्य आणि त्यांचे पुनर्वसन तसेच जागरूकता मोहिम आदी विषयांवर देशभरातील तज्ञ व्यक्ती या परिसंवादात विचार मांडणार आहेत. राष्ट्रीय पातळीवरील परिसंवादात पोलिस, रेल्वे पोलिस दल, कायदेतज्ज्ञ, सरकारी वकील, महिला व बाल संरक्षण अधिकारी, परिवहन क्षेत्र, समाजसेवी संस्थांचे प्रतिनिधी, तांत्रिक तज्ज्ञ सहभागी होणार आहेत.

# गाय चोरी केल्याच्या संशयावरुन तरुणाला जात- धर्म विचारुन निर्वस्त्र करुन निर्दयपणे मारहाण करणाऱ्या आरोपी विरुद्ध कठोर कारवाई

## भारतीय बौद्ध महासभे कडून गृहमंत्र्याला निवेदन सादर

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**लोणार** : भारतीय बौद्ध महासभा लोणार तालुक्याच्या वतीने दि.२९ जुलै २०२५ रोजी तहसीलदार यांच्यामार्फत माननीय गृहमंत्री यांना खामगाव येथे गाय चोरी केल्याच्या संशयावरून बौद्ध तरुणाला जात धर्म विचारून निर्वस्त्र करून निर्दयपणे मारहाण करणाऱ्या आरोपी विरुद्ध कठोर कारवाई करणे बाबत निवेदन सादर करण्यात आले. बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव या शहरांमध्ये समाजकंटक गुंड प्रवृत्तीच्या रोहित पगारिया आणि त्याचे तीन सहकारी अशा चौघांनी मिळून बौद्ध तरुण रोहन पैठणकर याला गाय चोरल्याचा संशयावरून जात धर्म विचारून निर्वस्त्र करून निर्दयपणे बेदम मारहाण करण्यात आली आहे. रोहित पगारिया आणि त्याचे तीन सहकाऱ्यांनी अमानुषपणे केलेल्या या मारहाणीमुळे रोहन पैठणकर या बौद्ध तरुणाची प्रकृती अत्यंत चिंताजनक आणि गंभीर झाली आहे. सदर घटना ही अत्यंत निंदनीय ,संतापजनक,आणि महाराष्ट्राला हादरून टाकणारीआहे. या घटनेमुळे समस्त आंबेडकरी समाजामध्ये आरोपी विरुद्ध प्रचंड जनक्षोभ निर्माण झालेला असून सदर घटना छ.शिवाजी महाराज ,फुले शाहू आंबेडकरांच्या महाराष्ट्राला काळीमा फासणारी आहे. सदर घटनेची शासन आणि पोलीस प्रशासनाने गांभीर्याने दखल घेऊन रोहित पगारिया आणि त्याचे तीन सहकारी अशा चौघांवर अनुसूचित जाती जमाती अत्याचार निवारण कायदा आणि भारतीय न्याय संहिता नुसार कठोरातील कठोर कारवाई करून रोहन पैठणकर या बौद्ध तरुणाला न्याय मिळवून द्यावा. अशा मागणीचे निवेदन भारतीय बौद्ध महासभा लोणार तालुक्याच्या वतीने मा तहसीलदार साहेब यांच्यामार्फत महाराष्ट्र राज्याचे गृहमंत्री यांना पाठवण्यात आले . निवेदन सादर करते वेळेस भारतीय बौद्ध महासभेचे तालुकाध्यक्ष सुधाकरजी वानखेडे, तुळशीदास घेवंदे सर, शिवाजी डोंगरदिवे सर ,संतोष गवई सर ,राहुल अंभोरे ,सदाशिव साबळे सर ,सरस्वती ताई साबळे मॅडम, विजय वानखेडे सर, सागर पनाड साहेब, एड. सुभाष लहाने , साहेबराव पाईकराव ,सतेश लांडगे, विनोद दाभाडे ,आर.एस. खरात, समाधान मोरे, भाई दिपक अंभोरे,अण्णा इंगळे ,विनोद दाभाडे, प्रल्हाद मोरे ,विजय



वाघ, विलासराव ढाकरके ,सुभाष मोरे, श्रीकृष्ण सरदार ,रतन मोरे ,तुकाराम साळवे साहेब ,शिवाजी आनंदराव सर, राहुल अंभोरे साहेब, ,गौतम मोरे ,गोरखनाथ पाडमुख ,हिम्मतराव सदावर्ते, गिताबाई खरात, शालुबाई शेजुळ, भीमराव शेजुळ, अर्जुन सरदार, गौतम अवसरमोल ,ओमप्रकाश अवसरमोल ,मंगेश मोरे ,समाधान मोरे इत्यादी समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होती.

### शेगांवच्या पायदलवारीत सहभागी होणाऱ्या भक्तांच्या सेवेसाठी केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या संकल्पनेतुन

## लासुरा येथे उभारला जाणार विशेष वैद्यकीय सेवा व मदत कक्ष

**बुलढाणा/प्रतिनिधी** : संत गजानन महाराजांच्या पालखीसोबत पायी चालणाऱ्या लाखो भक्त गणांच्या आरोग्य सुविधेसाठी केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या संकल्पनेतून लासुरा फाटा येथे विशेष वैद्यकीय सेवा आणि मदत कक्ष उभारण्यात आला आहे .

पंढरपूरच्या विठुरायाचे दर्शनासाठी गेलेली संत गजानन महाराजांची पालखी आषाढी एकादशीचा सोहळा आटोपुन पुन्हा शेगांवच्या दिशेने मार्गस्थ झाली आहे. तब्बल ६१ दिवसाचा पायी प्रवास आटपून ही पालखी ३० जुलै रोजी खामगाव नगरीमध्ये पोहणार असून पालखीचा शेवटचा मुक्काम ही खामगाव येथे होणार आहे त्यानंतर ३१ जुलैच्या सकाळीच ही पालखी शेगावच्या दिशेने मार्गस्थ होणार आहे या पालखी सोबत खामगाव ते शेगाव असा पायी प्रवास बुलढाणा जिल्ह्यातील लाखो भक्त गण करत असतात १८ किलोमीटरच्या या पायी दिंडी प्रवासामध्ये लहानांपासून तर थोरांपर्यंत श्री चे भक्तगण या शेवटच्या टप्प्यात पालखी प्रवासात सहभागी होतात आरोग्यसेवा हीच ईश्वरसेवा समजुन भक्तगणांच्या आरोग्य सुविधेसाठी केंद्रीय आरोग्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या संकल्पनेतून विशेष वैद्यकीय सेवा आणि मदत कक्ष लासुरा फाटा येथे उभारण्यात आला आहे. या मदत कक्षात दोन रुग्णवाहिका, डॉक्टर्स, नर्सेस, यांची पुरशी संख्या आणि औषधी साठा कक्षात ठेवण्यात आला आहे .. पायी चालणाऱ्या श्रीच्या भक्तगणांना काही त्रास जाणवल्यास वैद्यकीय मदत कक्षाची मदत घ्या असे आवाहन जिल्हा रुग्णालय प्रशासन आणि भुमीपुत्र वैद्यकीय मदत कक्षाच्या वतीने करण्यात आले ...

## कोकाटेंच्या मुद्द्यावरून हर्षवर्धन सपकाळ यांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांवर टीका





दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी आज अकोल्यात उपचार सुरू असलेल्या खामगावच्या दलित तरुणाची भेट घेतली आहे. तर बुलढाणा जिल्ह्यातील खामगावच्या रोहन पैठणकर या दलित तरुणाला कथित गोरक्षकांकडून मारहाण झाली होती. तर त्याच्यावर सध्या अकोल्याचा जिल्हा सर्वोपचार रुग्णालयातील सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत. तर सपकाळ यांनी आज या तरुणाची भेट घेत त्याची विचारपूस केली आणि यानंतर माध्यमांशी बोलताना त्यांनी सरकारवर जोरदार टीका केली आहे.

यासंदर्भात राज्यात दलितांवर सरकारच्या कृपेने अत्याचार सुरू असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला आहे. तर दलित तरुणाला अमानुष मारहाण करणारे आरोपी जामिनावर सुटतात कसे?, असा प्रश्न त्यांनी सरकारला विचारला आहे. तर अकोल्यातील उपचारात सरकार या दलित तरुणाची जाणीवपूर्वक हेळसांड करीत असल्याचा गंभीर आरोप ही सपकाळ यांनी केला आहे.

तर कोकाटेंच्या मुद्द्यावरून हर्षवर्धन सपकाळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांवर जोरदार टीका केली असून देवेंद्र फडणवीस हे राज्याच्या इतिहासातील सर्वात लाचार मुख्यमंत्री असल्याचा घणाघात त्यांनी केला आहे. तर मुख्यमंत्र्यांनी राज्याच्या विधिमंडळाला डब्ल्यूडब्ल्यूएफचा आखाडा केल्याचा प्रहार त्यांनी केला आहे. तर एकनाथ खडसेंच्या जावयाच्या मुद्द्यावरूनही त्यांनी सरकारवर टीका केली आहे.

तर भाजप आणि मोदींना विरोध करणाऱ्या कुणाचंही स्वागत असल्याचं सांगत त्यांनी राज ठाकरे यांच्या संभाव्य मैत्रीवर भाष्य केल असून सध्या खिचडी शिजत आहे. मात्र, आत्ताच महाविकास आघाडीत कोणताही नवा भिडू येणार नसल्याचं त्यांनी स्पष्ट केल आहे.

## नायगाव पाचला रस्त्यावरील पुल गेला वाहुन लोकप्रतिनिधीचे आणि तहसील विभागाचे दुर्लक्ष

दैनिक आपला विदर्भ

**नायगाव/प्रतिनिधी** : दत्तापूर आधीच शेतकरी यावर्षी अतिवृष्टी मुळे त्रस्त असून शेतकऱ्यांनी बँकेचे कर्ज काढून शेतीची पेरणी केली. जवळ असणारी मायापुंजी लावुन शेतीची मशागत करत असताना नायगाव दत्तापूर येथील शेतकऱ्यांना शेतात काम करण्यासाठी जाता येत नाही कारण नायगाव पाचला रस्त्यावरील पूल पुरामुळे वाहुन गेला आहे. आता शेतकऱ्यांना शेतात काम करण्यासाठी कसे जावे असा यक्ष प्रश्न पडला आहे. शेकडो शेतकरी आधीच या अस्मानी सुलतानी संकटाचा सामना करत असताना या शेतकऱ्यावर शेतात जाण्यासाठी कसरत करावी लागत आहे.

अतिवृष्टी ची पाहणी करण्यासाठी केंद्रीय मंत्री मा. प्रतापराव जाधव व माजी आमदार संजय रायमूलकर हे शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी आले होते. त्यांनी पाहणी करून शेतकऱ्यांना मदत मिळवून देऊ अशी आश्वासनाची थाप देऊन शेतकऱ्यांना तात्पुरता दिलासा देऊन प्रशासनाला पंचनामे करण्याचे निर्देश दिले होते. शेतकरी आता यांच्या आशेवर बसलेला आहे.यांना सुद्धा शेतकऱ्यांनी नायगाव पाचला रस्त्याच्या पुलाची पाहणी करून मदतीची याचना केली होती त्यावेळेस हे काम मार्गी लावू असा शब्द दिला होता पण एक महिना उलटून गेला तरी शेतकऱ्यांना कुणीच अजून मदत केली नाही.

तसेच विद्यमान आमदार सिद्धार्थ खरात यांनी तर अजून या पुलाचीपाहणी सुद्धा केली नाही. तरी आमदार साहेबांनी पुलाची पाहणी करून शेतकऱ्यांना न्याय मिळवून द्यावा अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करीत आहे.



# शेतकरी आत्महत्याग्रस्त दांपत्याच्या कुटुंबास आमदार रोहित पवार यांची सांत्वनपर भेट

दैनिक आपला विदर्भ






**बुलढाणा/प्रतिनिधी** : चिखली तालुक्यातील भरोसा येथील शेतकरी पती-पत्नीने आत्महत्या केली होती. त्या कुटुंबाला आमदार रोहित पवार यांनी सांत्वनपर भेट देऊन त्यांचे सांत्वन केले.

चिखली तालुक्यातील भरोसा गावातील व गणेश थुट्टे व त्यांचे पत्नीने सततच्यांना पिके मुळे झालेल्या कर्जामुळे तसेच शेती नावावर करण्यासंदर्भात संबंधित विभागाकडून अनेक वर्षापासून टाळाटाळ करण्यात आल्याने निराश झालेल्या या थुट्टे दांपत्याने टोकाची भूमिका घेत आत्महत्या केली. या घटनेची माहिती मिळताच राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार तथा युवा नेते रोहित पवार यांनी चिखली तालुक्यातील भरोसा या गावी जाऊन आत्महत्याग्रस्त कुटुंबीयांचे सांत्वन करीत त्यांच्यासोबत चर्चा केली. तसेच या कुटुंबाला शासकीय पातळीवरती जास्तीत जास्त कुठली मदत मिळेल या संदर्भात विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांच्याशी चर्चा केली. यावेळी बोलताना सत्ताधाऱ्यांच्या शेतकरी विरोधी धोरणामुळे राज्यात दररोज शेतकरी आत्महत्या होत आहे. असा आरोप त्यांनी केला.

आत्महत्याग्रस्त थुट्टे कुटुंबाच्या सांत्वनपर भेट दिल्यानंतर माध्यमांशी बोलताना राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते तथा आमदार रोहित पवार माध्यमांशी बोलताना म्हणाले की, एकनाथ खडसेसह माझ्यावर ही पाळत ठेवली जात आहे. देवेंद्र फडणवीस यांच्या जवळ काही छोटे नेते भूकण्यासाठी ठेवले आहेत. भाजपमधील जवळचे काही छोटे नेते फडणवीस यांच्या इशाऱ्यावर भूकतात. सुधीर मुनगंटीवार भाजप मध्ये नाराज आहेत. मात्र, मुनगंटीवार स्वाभिमानी माणूस आहेत. मुनगंटीवार कुणाचे ऐकत नाही, म्हणून त्याचा मंत्रिमंडळातून पत्ता कट झाला आहे. राज्यातील ४ कोटी शेतकरी कोकाटेंवर नाराज आहे. कोकाटें चे समर्थन करणारे शेतकरी लाभार्थी असतील. शेतकऱ्यांनी एकदा संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांनासोबत घेऊन सरकारला भेटावे.गोविंदा पथक कुणाचे नसते ते युवा कार्यकर्ते असतात. दुर्दैवान द्वेषाचे राजकारण महाराष्ट्रामध्ये वाढत चालले आहे.जेव्हढा सत्तेचा माज हे दाखवतील तेव्हाच संताप सर्वसामान्य मध्ये होईल. एकनाथ खडसे सह माझ्यावर ही पाळत ठेवल्या जात आहे. तसेच माझ्यावर ईडी आणि इन्कम टॅक्सचे लक्ष आहे. असा आरोप आमदार रोहित पवार यांनी माध्यमांशी बोलताना केला.